MAHARASHTRA TOURISM

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ
पर्यटन विभाग, महाराष्ट्र शासन




# वारली चित्रकला

*सजीव वारली गावांचा अनुभव*

पालघर जिल्हा, महाराष्ट्र

# महाराष्ट्रातील सांस्कृतिक पर्यटन स्थळे






# महाराष्ट्राचा सजीव सांस्कृतिक वारसा

महाराष्ट्र म्हणजे संस्कृतीचा एक अथांग महासागर आहे, जिथे प्राचीन पाषाणशिल्पे आणि आजही जपलेला आदिवासी वारसा एकाच वेळी अनुभवायला मिळतो. सह्याद्रीच्या हिरव्यागार कुशीत वसलेले पालघर आणि नाशिक जिल्हे म्हणजे या संस्कृतीचे काठोकाठ भरलेले जणू जिवंत कुंभ! येथे कोकणा, महादेव कोळी आणि वारली समाजाच्या पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परंपरा आजही तितक्याच चैतन्यमय आहेत.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) आणि स्थानिक समाज यांच्या संयुक्त प्रयत्नातून आम्ही आपल्याला या समृद्ध संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी साद घालत आहोत. वारली चित्रांमधील तरल नजाकत असो, बोहाडा मुखवट्यांचे ओजस्वी रूप असो, किंवा बांबू कलेतील कौशल्य असो अथवा लोकगीतांच्या तालावर थिरकणारी पावले असोत इथली प्रत्येक गोष्ट या मातीची आणि माणसांची गोष्ट सांगते. ही पुस्तिका आपल्याला विशेषतः वारली चित्रकलेची ओळख करून देते—जी केवळ कला नसून विधी, निसर्ग आणि जगण्याची एक आगळीवेगळी परिभाषा आहे.

नेहमीच्या वाटा सोडून या परिसरातील लपलेला सांस्कृतिक ठेवा शोधण्यासाठी आणि इथल्या परंपरा जपणा-या सांस्कृतिक वारसदारांशी संवाद साधण्यासाठी हा प्रदेश खुणावतो आहे. येथे संस्कृती हा केवळ प्रदर्शनाचा विषय नाही, तर तो जगण्याचा अद्भुत सोहळा आहे—जिथे माती, माणसे आणि मूल्ये एकत्र येऊन महाराष्ट्राच्या संस्कृतीचे अस्सल रूप उलगडतात.



# वारली चित्र गाथा

2014 मध्ये 'भौगोलिक मानांकन' (GI Tag) मिळालेली वारली चित्रकला हा एक सजीव वारसा आहे; जिथे रेषां-रेषांनमधुन अनोखी चित्रगाथा गुंफली आहे आणि ज्यामुळे जमीन, माणूस अन् जीवन एकाच लयीत गुंफले जाते. वारली आदिवासी समुदायाने जोपासलेल्या या कलेचा नेमका उगम अपरिचित असला, तरी यातील रेषा दहाव्या शतकापासून चालत आलेल्या कला परंपरेची साक्ष देतात. धार्मिक विधी, अनेक स्मृती आणि पिढ्यानपिढ्यांच्या सहजीवनातुन हा वारसा आजही अखंड प्रवाहित आहे.

पारंपारिकपणे, सण-उत्सव आणि शुभप्रसंगी गावातील स्त्रिया घरांच्या भिंतींवर ही चित्रे रेखाटत असत. आज मात्र स्त्री आणि पुरुष अशा दोघांनीही या कलाप्रकाराला आपलेसे केले आहे. मातीच्या भिंतींवर तांदळाच्या पिठाने रेखाटलेली ही कला वर्तुळ, त्रिकोण आणि चौकोन अशा मूलभूत आकारांतून बोलते. यातून श्रम आणि विरंगुळा, जन्म आणि विवाह, लोककथा, सण आणि बदलत्या जगाचे पदर उलगडले जातात. जरी आज ही कला मातीच्या भिंती ओलांडून कागद आणि कॅनव्हासवर पोहोचली असली, तरी तिचा मूळ आत्मा आजही समाजमनाच्या लयीशी जोडलेला आहे.

# परंपरेचे केंद्रस्थान

पालघर हे वारली चित्रकलेचे जन्मस्थान आहे. हा परिसर या कलेचे जणु हृदयस्थान आहे. वारली परंपरा आजही येथे जीवंत आहे जणु ही कला आजही श्वास घेते आणि बहरत आहे. डहाणू तालुक्यातील गंजाड आणि बापूगाव यांसारख्या गावांत, तसेच जव्हार आणि तलासरीमध्ये कलाकार आजही ही परंपरा जोपासत आहेत. येथे येणाऱ्या पर्यटकांना वारली चित्रकलेच्या अनोख्या विश्वात डोकावता येते. ही कला केवळ संग्रहालयात जतन केलेली नसून, ती इथल्या दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणून आजही ती जिवंत आहे, बहरत आहे.







# वारली कला परंपरेचे रक्षक

वारली चित्रकला ही केवळ एक प्रासंगिक उत्सव परंपरा होती. केवळ एक विधीपासून ते जागतिक स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या कलेपर्यंतचा अनोखा प्रवास हा स्वर्गीय पद्मश्री जिव्या सोमा म्हसे यांच्या महत्वपुर्ण योगदाना शिवाय अपूर्ण आहे. डहाणूतील गंजाडचे रहिवासी असलेल्या पद्मश्री म्हसे यांनी 1970 च्या दशकात ही कला गावातील भिंतींवरुन कागद आणि कॅनव्हासवर आणली. त्यांनी वारली चित्रकलेतील साध्या रेषा जागतिक पातळीवर पोहोचवल्या आणि ठिपक्यां-ठीपक्यांची चित्रभाषा मानवी भावनेची वैश्विक भाषा म्हणुन जगासमोर उलगडली, कलेला प्रतिष्ठा दिली.

# निर्मितीची प्रक्रिया

1



**पुर्वतयारी:** चित्रासाठीची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी भिंतीवर शेण आणि लाल मातीचा (गेरूचा) लेप दिला जातो, ज्यामुळे एक नैसर्गिक पोत तयार होतो.

2



**रंग निर्मिती:** पांढरा रंग तयार करण्यासाठी तांदळाची पिठी पाण्यात मिसळून त्यात नैसर्गिक डिंकाचा वापर केला जातो.

3



**कुंचल्याची निर्मिती:** वारलीसाठी ब्रश ( कुंचले ) बाजारातून विकत घेतले जात नाहीत, तर विशिष्ठ बारीक रेषा काढण्यासाठी स्थानिक बांबूच्या काड्या चावुन किंवा ताडाच्या काट्यांपासुन त्यांचे बारीक कुंचले तयार केले जातात, ज्यामुळे सुबक रेषा रेखाटता येतात.

4



**भौमितिक मांडणी:** कलाकार चित्राची सुरुवात मध्यवर्ती संकल्पनेपासून (सहसा 'चौक' किंवा झाड) करतात आणि तिथून चित्रकथा बाहेरच्या बाजूला विस्तारत जाते.

5



**मानव आणि प्राणी यांचे आकार:** धड आणि कंबरेचा आकार दर्शविण्यासाठी दोन त्रिकोण टोकाला जोडले जातात—हालचाल आणि जिवंतपणा दर्शवणारी ही एक कल्पक पद्धत आहे.

6




**अंतिम स्वरूप:** रेखाटलेले चित्र नैसर्गिकरित्या सुकु दिले जाते, ज्यामुळे तांदळाची पिठी मातीच्या पृष्ठभागाशी घट्ट जोडली जाते. आणि मग अंतिम चित्र आकाराला येते.

# चित्रांतील विषय

वारली कला वर्तुळ, त्रिकोण आणि चौकोन या तीन मूलभूत आकारांच्या अत्यंत साध्या दृश्य भाषेतून व्यक्त होते. हे आकार शेती, मासेमारी, जन्म, विवाह आणि सण-उत्सवांच्या चित्रकथा उलगडतात. तसेच, यातून प्राचीन लोककथा, दंतकथा आणि मानवी जीवनातील दैनंदिन घडामोडींचे प्रतिबिंब उमटते.

## लोककथा आणि दंतकथा



*कलाकार: रीना वळवी*



*कलाकार: शांताराम गोरखाना*

## जीवनचक्र



*कलाकार: रूपेश गोरखाना*




*कलाकार: कुसुम खरपडे*

## दैनंदिन जीवनातील काव्य




कलाकार: रमेश हेंगाडी



कलाकार: रमेश हेंगाडी

## समकालीन कलाकृती



कलाकार: गणेश वांगड



कलाकार: दर्शना रूपेश गोरखाना

# भिंतींच्या पलीकडे: आधुनिक आविष्कार

मूळची ही भित्तिचित्रांची कला असली, तरी आजची वारली कला आधुनिक माध्यमांशी तितक्याच सहजतेने जुळवून घेत आहे. घराची सजावट, जीवनशैलीची उत्पादने आणि जागतिक बाजारपेठेला साजेसे कलाप्रकार यांतून या कलेने स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. या आधुनिक बदलांमुळेच ही कला आजही जागतिक स्तरावर टिकून आहे.



लघु वारली घर



सजावटीचा ट्रे



हस्तनिर्मित पुस्तक



तारपा वाद्याची प्रतिकृती



साठवणुकीचा डबा







# पालघरचे लोक इतिहास संग्रहालय

या सांस्कृतिक भूमीचा प्रवास करताना, घोलवड येथील ‘पालघर लोक इतिहास संग्रहालया’ला नक्की भेट द्या. या प्रदेशातील समृद्ध वारशाची ओळख करून देणारे हे एक सजीव केंद्र आहे. 1880 च्या दशकातील एका ऐतिहासिक शालेय वास्तूत उभारलेले हे संग्रहालय, पालघरच्या वैविध्यपूर्ण लोककलांचे अतिशय सुंदर दर्शन घडवते.

येथे पर्यटकांना वारली चित्रकलेसोबतच बोहाडा मुखवटे, बांबू काम, पारंपारिक तारपा वाद्ये आणि लोकसंगीताच्या परंपरेचा जवळून परिचय होतो. या संग्रहालयात स्थानिक पारशी वारसा, या भागातील नामवंत कलाकार आणि ग्रामीण जीवनातील दैनंदिन वस्तूंचे विशेष विभाग आहेत. विशेष म्हणजे, यातील अनेक वस्तू इथल्या गावकर्यांनी स्वतःहून या संग्रहालयाला भेट दिल्या आहेत.

केवळ वस्तूंचा संग्रह नसून, हे संग्रहालय म्हणजे इथल्या आठवणी आणि सातत्य जपणारे एक अनोखे स्थान आहे-जिथे या भूमीची आणि माणसांची गाथा जिवंत होते. डहाणूपासून साधारण 15 किमी उत्तरेला असलेले घोलवड रेल्वेमार्गाने आणि रस्त्याने उत्तमरित्या जोडलेले आहे.







# संस्कृतीचा अक्षय प्रवाह

वारली चित्रकला ही एक प्रवाही परंपरा आहे, जिथे 'मातीच्या रंगाचे संमेलन' यांसारख्या ग्रामोत्सवांतून तिचा उत्सव साजरा होतो. या संमेलनांमध्ये ज्येष्ठ कलाकार आणि नवोदीत कलाकार आपली कला एकत्रितपणे मांडतात. अशा उपक्रमांमुळे कलेचे सातत्य टिकून राहते; मुले आणि तरूण पिढी कार्यशाळांच्या माध्यमातून थेट मार्गदर्शन मिळवतात. यामुळे जुन्या परंपरांचा वारसा जपत असतानाच नवनवीन प्रयोगांची दारेही उघडली जात आहेत.

आगामी आयसीएच उत्सव:
सुरगणा, नाशिक – 2 ते 4 ऑक्टोबर 2026
जव्हार, पालघर – 3 ते 4 ऑक्टोबर 2026

# प्रवास आणि संपर्क

मुंबई ते डहाणू हे अंतर रेल्वे किंवा रस्ते मार्गाने पार करण्यासाठी साधारण 3 ते 4 तास लागतात.

- गंजाड: डहाणू-जव्हार रस्त्यावर डहाणूपासून साधारण 22 किमी आग्नेयेला (Southeast).
- बापूगाव: कासा नाक्यामार्गे डहाणूपासून साधारण 35 किमी ईशान्येला (Northeast).

| कलाकारांची नावे | संपर्क |
|---|---|
| किशोर म्हसे | 8975391497 |
| अनिल वांगड | 8087980681 |
| शांताराम गोरखाना | 8087972762 |
| रमेश हेंगाडी | 9226193016 |
| विजय म्हसे | 9503440082 |
| प्रवीण म्हसे | 9011622110 |
| गणपत बाळू दुमाडा | 8317278393 |
| संजय परहाड | 9049343532 |
| अनिता म्हसे-दळवी | 8975700822 |
| राजेश वांगड | 9421625728 |

### एका दिवसात वारली संस्कृतीचा अनुभव

- घोलवड संग्रहालयाला भेट
- गंजाडकडे प्रयाण
- कलाकारांशी संवाद
- प्रत्यक्ष कार्यशाळेत सहभाग
- स्थानिक जेवणाचा आस्वाद
- कलाकृतींची खरेदी

येथे पर्यटकांना अथांग किनारपट्टीच्या सौंदर्याचा अनुभव घेता येईल, संथ किनाऱ्यांवर निवांत वेळ घालवता येईल आणि पालघरच्या शांत ग्रामीण निसर्गातील टुमदार फार्महाऊसमध्ये राहण्याचा आनंद लुटता येईल.





*“वर्तुळ म्हणजे सूर्य आणि चंद्र; त्रिकोण म्हणजे डोंगर आणि अणकुचीदार झाड.*
*यांच्याशिवाय जीवन नाही, आणि जीवनाशिवाय कला नाही.”*

*– वारली समुदायाची म्हण*

## वारलीच्या ‘सजीव’ विश्वाचा अनुभव घ्या

अशा वारली गावांना भेट द्या जिथे घरांच्या भिंती तुमच्याशी संवाद साधतात आणि वर्तुळ-त्रिकोणांच्या आकारांतून नवनवीन कथा उलगडतात. कलाकारांना त्यांच्या घरी भेटा, त्यांच्या कलेची लय समजून घ्या आणि डोळ्यांसमोर साकारणाऱ्या कलाकृतींचे साक्षीदार व्हा.

कलाकारांच्या सान्निध्यात राहून ही लोककला आत्मसात करा, स्थानिक कलाकारांच्या सोबतीने काम करा आणि वारली कलेतील नवनवीन प्रयोगांच्या वाटा शोधून पहा.

डिझाइनर्स, वास्तुविशारद आणि खरेदीदारांसाठी:

- स्थळ-वैशिष्ट्यपूर्ण भित्तिचित्रे
- अस्सल वारली पेंटिंग्सची खरेदी
- सहयोगातून डिझाइन प्रकल्प
- नैतिक कॉर्पोरेट गिफ्टिंग
- कलाकारांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा

अधिक माहितीसाठी
QR कोड स्कॅन करा

MAHARASHTRA TOURISM

/Explore Maharashtra - MTDC
/exploremaharashtra.mtdc
www.heritagevillagesmtdc.com
ich@maharashtratourism.gov.in